दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www.sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • १९५ • RNI : MAHMAR/2023/87818 • मंगळवार, दि.२० मे २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Agro. Tourism & Adventure Park


कृषी पर्यटन व अ‍ॅडवेंचर पार्क

# छगन भुजबळ आज घेणार मंत्रिपदाची शपथ

# धनंजय मुंडेंकडील खाते मिळण्याची शक्यता

## राजभवनात होणार शपथविधी सोहळा;अखेरीस भुजबळांच्या नावावर शिक्कामोर्तब

मुंबई (वृत्तसंस्था)–राज्याच्या राजकारणातून मोठी बातमी समोर येत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांना अखेर मंत्रिपद देण्यात येणार आहे. मुंबईतील राजभवनात मंगळवारी सकाळी १० वाजता त्यांच्या शपथविधीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. ५० जणांच्या उपस्थितीत छगन भुजबळ यांचा शपथविधी सोहळा होणार आहे. याच पार्श्वभूमीवर राजभवनात सोमवारी रात्रीपासूनच जोरदार तयारी सुरू झाली आहे.महायुती सरकारमध्ये मंत्रिपद न मिळाल्यामुळे छगन भुजबळ हे नाराज होते. त्यांनी स्वत: अनेक वेळा आपली नाराजी जाहीरपणे व्यक्त करत केली होती. तसेच पक्षाचे अध्यक्ष आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावरही अप्रत्यक्ष टीका केली होती. मागील काही दिवसांपासून भुजबळ मंत्रिमंडळामध्ये कमबॅक करतील अशी चर्चा रंगली होती. यानंतर आता छगन भुजबळ यांचे पक्षाकडून राजकीय पुनर्वसन होताना दिसत आहे. राज्याच्या आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पार्श्वभूमीवर ओबीसी समाजाचा महत्त्वाचा चेहरा म्हणून भुजबळ यांना मंत्रिपदाची संधी दिली जात असल्याची चर्चा आहे.



### धनंजय मुंडेंचे खाते मिळण्याची शक्यता

विशेष म्हणजे, छगन भुजबळ यांच्याकडे माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्याकडे असलेले अन्न व नागरी पुरवठा खाते सोपवले जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणामुळे धनंजय मुंडे यांच्यावर विरोधकांनी गंभीर आरोप केले होते. या आरोपामुळे धनंजय मुंडे चांगलेच अडचणीत सापडले होते. धनंजय मुंडेंचा निकटवर्तीय वाल्मीक कराडसह संपूर्ण टोळी गजाआड गेली. संतोष देशमुख यांना मारहाणीचे फोटो समोर आल्यानंतर महाराष्ट्रामध्ये एकच खळबळ उडाली. त्यानंतर धनंजय मुंडेंना मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला होता. आता अन्न व नागरी पुरवठा खाते छगन भुजबळ यांच्याकडे देण्यात येणार असल्याचे सूत्रांकडून समजते.

### अखेरीस भुजबळांच्या नावावर शिक्कामोर्तब

धनंजय मुंडे यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिल्यानंतर त्यांच्या जागी कोणाची वर्णी लागणार, यावरून राज्याच्या राजकारणात मोठी चर्चा सुरू झाली होती. त्याच दरम्यान, छगन भुजबळ यांचे नाव पुन्हा एकदा जोरदारपणे चर्चेत आले. राष्ट्रवादी काँग्रेसच्या कोट्यातून रिक्त झालेल्या मंत्रिपदावर त्यांना संधी मिळावी, अशी मागणी पक्षांतर्गत पातळीवरही होत होती. मात्र, अजित पवारांनी निर्णय तळ्यातमळ्यात ठेवला होता. अखेरीस आता छगन भुजबळ यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले आहे.

### भुजबळांची नाराजी दूर करण्यात येणार?

छगन भुजबळ हे राज्याच्या राजकारणातील मातब्बर आणि अनुभवी नेते आहेत. मात्र त्यांना महायुतीच्या मंत्रिमंडळात संधी मिळाली नव्हती. मंत्रिमंडळात स्थान न मिळाल्याची खंत त्यांनी अनेकदा व्यक्त केली होती. तसेच त्यांनी अजित पवारांवरही टीका केल्याचे दिसून आले. भुजबळांची हीच नाराजी आता दूर करण्यात येणार आहे.

### औद्योगिक क्षेत्रात दहशतीचा दणका!

# चार दांडकाधारी हल्लेखोरांचा पियुषवर सिनेस्टाईल हल्ला

## रक्ताच्या थारोळ्यातून बचावून पोहोचला थेट पोलीस स्टेशनमध्ये!

**शिरूर । रमेश बनसोडे**

रांजणगाव एमआयडीसीच्या गेटवर संध्याकाळच्या सावलीत जे घडलं, त्याने संपूर्ण परिसर हादरवून सोडलाय! पियुष विष्णू चव्हाण (२५, रा. गोलेगाव) या तरुणावर चार अनोळखी इसमांनी पाईप आणि दांडक्यांनी बेदम मारहाण केली. हल्ला एवढा थरारक होता की पियुष रक्तबंबाळ अवस्थेत जमिनीवर कोसळला पण जगण्याची झुंज देत तो थेट पोलीस स्टेशन गाठतो . हे कुठल्या ॲक्शन सिनेमाचं दृश्य नव्हतं, तर १५ मे रोजी सायंकाळी साडेसहा वाजता घडलेली खरी घटना होती.

दैनंदिनप्रमाणे ड्युटी संपवून दुचाकीवरून घरी परतणाऱ्या पियुषला कंपनी गेटजवळ अचानक चार अज्ञातांनी आडवलं.तुला खूप माज आलाय का! असा सवाल करत एका गुंडाने डोक्यात घाव घातला. त्यानंतर



उरलेल्या तिघांनी प्लास्टिक पाईप आणि लाकडी दांडक्यांनी जबर मारहाण सुरू केली.डोकं, पाठ, शरीर कोणतीच जागा बाकी राहिली नाही!हल्ल्यानंतर अनेकजण असहाय झाले असते. पण पियुषने शुद्धीत असतानाच दुचाकीवर स्वत:ला सावरत रांजणगाव एमआयडीसी पोलीस ठाण्यात धाव घेतली.तेथे त्याने तक्रार दाखल करताच गुन्हा रजि. नं. १५७/२०२५ अन्वये आय.पी.सी.च्या गंभीर कलमांखाली एफआयआर नोंदवण्यात आला.पो.हे. इनामे यांच्याकडे तपास सोपवण्यात आला असून, सीसीटीव्ही फुटेज आणि परिसरातील माहितीच्या आधारे आरोपींचा शोध सुरू आहे.या घटनेमुळे एमआयडीसी परिसरात असुरक्षिततेचं वातावरण निर्माण झालंय. कामगार, अधिकारी आणि स्थानिक नागरिकांमध्ये संताप पसरलाय.संध्याकाळी कामावरून घरी जातानाही जीव मुठीत धरावा लागतोय का?असा सवाल उपस्थित होतोय.औद्योगिक सुरक्षेचा बडगा फक्त कागदावर राहिलाय का, असा सवाल उपस्थित होत असून, पुढील अशा घटनांना आळा घालण्यासाठी पोलीस आणि प्रशासनाच्या यंत्रणांपुढे मोठं आव्हान उभं राहिलं आहे.

# जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते नवीन जिल्हा माहिती कार्यालयाचे उद्घाटन



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या १०० दिवस प्रशासकीय सुधारणा आराखड्याअंतर्गत चंद्रपूर जिल्हा माहिती कार्यालयाचे नुतणीकरण करण्यात आले असून जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांच्या हस्ते आज (दि. १८) सदर कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले.यावेळी जिल्हाधिकारी श्री. गौडा यांनी कार्यालयाची पाहणी केली. तसेच लोकराज्य वाचन कक्षात विद्यार्थ्यांशी संवाद साधला. चांगला अभ्यास करा. काही अडचणी असल्यास सांगा. साधनसामुग्रीची कमतरता असल्यास त्वरीत उपलब्ध करून देऊ, अशी ग्वाही सुध्दा दिली. कार्यक्रमाला जिल्हा माहिती अधिकारी राजेश येसनकर, लिपिक-टंकलेखक सचिन खोब्रागडे, सहायक छायाचित्रकार निखील सोनवणे, सहायक संघर्ष कांबळे, क्षितिज किटे व इतर अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

जिल्हा माहिती कार्यालयात आता अधिकारी - कर्मचा-यांसाठी स्वतंत्र कक्ष, प्रत्येक कक्षावर नामफलक अभ्यागतांसाठी प्रतिक्षालयाची निर्मिती, तसेच कार्यालयाच्या दर्शनी भागात पत्रकारांसाठी राबविण्यात येणा-या योजनांची माहिती, लोकसेवा हक्क कायदा आणि माहिती अधिकार कायद्याची माहिती लावण्यात आली आहे. तसेच शासनाच्या कल्याणकारी योजनांची माहिती व्हावी, यासाठी दर्शनी भागात डीजीटल स्टँडीसुध्दा आहे. जिल्हा माहिती कार्यालयाच्या सोशल मिडीयाचे (फेसबुक, एक्स, ब्लॉग, युट्युब, इंस्टाग्राम) तसेच पत्रकारांच्या योजनांचे स्वतंत्र क्यूआर कोड सुद्धा निर्माण करण्यात आहे. सदर क्यूआर कोड स्कॅन करताच माहिती उपलब्ध होते.

### मूल तालुक्यात चोर बीटी बियाण्यांची खुलेआम विक्री

# कृषी विभागाचे अक्षम्य दुर्लक्ष शेतकऱ्यांना सावध राहण्याचे आवाहन

**मूल । प्रतिनिधी**

तालुक्यातील शेतकरी अवकाळी पावसानंतर मशागतीच्या कामाला लागले असून खरीप हंगामासाठी बी-बियाण्यांची खरेदी सुरू केली आहे. मात्र या पार्श्वभूमीवर शासनाने बंदी घातलेले 'चोर बीटी (बीजी-३)' कापूस बियाणे खुलेआम विक्रीस ठेवले जात असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. विशेष म्हणजे, कृषी विभाग या प्रकाराकडे डोळेझाक करत असल्याचे चित्र आहे.

बीजी-३ या बियाण्यांवर शासनाने बंदी घातलेली असून त्याचा शेतजमिनीच्या सुपीकतेवर व मानवाच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होतो. कॅन्सरसारख्या आजारांचा धोका निर्माण होतो, यामुळेच या बियाण्यांची आयात, विक्री व लागवड निषिद्ध आहे. तरीही तेलंगणातून चोरट्या




मार्गाने हे बियाणे जिल्ह्यात आणले जात असून मूल तालुक्यात त्याची मोठ्या प्रमाणात विक्री सुरू आहे.

कृषी केंद्रांमध्ये या चोर बीटी बियाण्यांची सर्रास विक्री होत असून कृषी विभाग मात्र कारवाईस टाळाटाळ करत आहे. यामुळे कृषी अधिकाऱ्यांची व बियाणे विक्रेत्यांची मिलीभगत असल्याची जोरदार चर्चा शेतकरी वर्गात आहे. तालुक्यातील एकूण कापूस लागवडीपैकी सुमारे ८० टक्के शेतकरी चोर बीटी बियाण्यांचा वापर करत असल्याचे अंदाज व्यक्त केला जात आहे.या बियाण्यांचा वापर केल्यास पीक तणनाशकाला प्रतिकार करते. परिणामी शेतकरी अधिक प्रमाणात व तीव्र तणनाशक फवारणी करतो. यामुळे शेतजमिनीचा पोत बिघडतो, जैवविविधतेला धोका निर्माण होतो आणि शेवटी जमीन नापीक बनते. शिवाय या रसायनांचा मानवाच्या आरोग्यावरही गंभीर परिणाम होतो.

यंदा कापसाच्या दरात मोठी घसरण झाल्याने शेतकरी आधीच संकटात आहेत. त्यामुळे कमी खर्चात जास्त उत्पादन मिळविण्याच्या लालसेपोटी अनेक शेतकरी या प्रतिबंधित बियाण्यांच्या खरेदीला बळी पडत आहेत. याचा फायदा घेत काही नफेखोर व्यापारी आणि दलाल त्यांची दिशाभूल करत चोर बीटी बियाण्यांची विक्री करत आहेत.

### शंकरपूरात जलजीवन मिशनचे पाणी कधी मिळणार?


# कंत्राटदाराच्या चौकशीची ग्रामस्थांची तातडीची मागणी

**चिमूर । शेषराव राऊत**

चिमूर तालुक्यातील शंकरपूर गावातील नागरिक गेल्या अडीच वर्षांपासून जलजीवन मिशन अंतर्गत हर घर नळ हर घर जल योजनेच्या पाणीपुरवठ्याच्या प्रतीक्षेत आहेत. २२ डिसेंबर २०२२ रोजी नामदार गुलाबराव पाटील यांच्या हस्ते भूमिपूजन झालेल्या या योजनेसाठी अंदाजे सात कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला होता. मात्र, अजूनही पाणीपुरवठा सुरू झालेला नाही.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या देखरेखीत काम करणाऱ्या मे. ज्योती कंट्रक्शन कंपनी, चंद्रपूर या कंत्राटदाराने गावातील सिमेंट रस्ते व भूमिगत गटारे फोडून पाईपलाईन टाकली असून, तरीही रस्ते व भूमिगत गटारे दुरुस्त करण्यात अजूनही उदासीनता दिसत आहे. यामुळे गावातील नागरिकांना अनेक त्रास सहन करावे लागत आहेत. येत्या पावसाळ्यात या गटारांत पाणी साचून आरोग्य तसेच अपघातांचा धोका वाढणार असल्याची भीती ग्रामस्थ व्यक्त करत आहेत.

शंकरपूर ग्रामपंचायतचे उपसरपंच अशोक चौधरी यांनी संबंधित विभागाला अनेकदा पत्रव्यवहार



करून समस्या सांगितल्या असताना देखील कंत्राटदारावर कोणतीही कठोर कारवाई झालेली नाही. पाणीपुरवठा विभाग व कंत्राटदार यांच्यात हातमिळवणी झाल्याचे नागरिकांचे मत असून, याप्रकरणी सखोल चौकशी आणि कायदेशीर कारवाईची मागणी करण्यात येत आहे.

जर पुढील पंधरा दिवसांत पाणीपुरवठा सुरू झाला नाही, तर शंकरपूर येथील महिला एकत्र येऊन संबंधित विभागाच्या विरोधात घागर मोर्चा काढणार असल्याचा इशारा दिला आहे.

# दीपक दुधे यांचा उपनिरीक्षक पदी बढती मिळाल्याने वर्गमित्रांकडून सत्कार

## जुन्या आठवणींना मिळाला उजाळा; दिवाळीत पुन्हा भेटण्याचा निर्धार

**मूल । प्रतिनिधी**

मूलच्या मातीतून घडलेल्या आणि पोलीस उपनिरीक्षक पदावर बढती मिळवलेल्या दीपक दुधे यांचा त्यांच्या वर्गमित्रांकडून रविवारी (ता. १८ मे) उत्साहात सत्कार करण्यात आला. व्हॉट्सअॅप ग्रुपच्या माध्यमातून अभिनंदन करत एका दिवसातच नियोजन करून हॉटेल शिवार येथे भावनिक आणि आनंददायी वातावरणात हा कार्यक्रम पार पडला.दीपक दुधे हे याआधी रामनगर पोलीस स्टेशन, चंद्रपूर येथे पोलिस अंमलदार पदावर कार्यरत होते. २०१३ मध्ये त्यांनी विभागांतर्गत अर्हता परीक्षा दिली होती. नुकत्याच पोलीस महासंचालक यांच्या आदेशानुसार त्यांची कोकण-२ महसूल विभागाअंतर्गत मुंबई शहर येथे पोलीस उपनिरीक्षक पदावर नियुक्ती झाली आहे.

या यशस्वी प्रवासाच्या निमित्ताने वर्गमित्रांनी सत्कार सोहळा आयोजित करून दीपक यांचा शाल, श्रीफळ आणि स्मृतिचिन्ह देऊन गौरव केला. या कार्यक्रमाला ज्येष्ठ पत्रकार विजय सिद्धावार, पंचायत राज प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य अविनाश गरपल्लीवार, पोंभुर्णा पंचायत समितीचे सहायक प्रशासन अधिकारी किरण वाढई, पत्रकार राजू गेडाम, हॉटेल शिवारचे संचालक बळवंत करकाडे, कर्मवीर महाविद्यालयाचे वरिष्ठ सहायक किशोर वाकडे व विनायक रेकलवार यांची प्रमुख उपस्थिती होती.सत्काराच्या निमित्ताने कॉलेजमधील गोड-तिखट आठवणींना उजाळा देण्यात आला. त्या दिवसांतील धमाल, मैत्री आणि हास्याचा माहोल पुन्हा अनुभवता आला. यावेळी प्राचार्य अविनाश गरपल्लीवार यांनी, दिवाळीत असाच एक स्नेहमेळावा आयोजित करू, त्यातील जेवणाचा सर्व खर्च मी करीन,असे जाहीर करून उपस्थितांची मनं जिंकली.कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी एकमेकांना भेटण्याचे वचन देत आणि संपर्कात राहण्याची आशा व्यक्त करत जड अंतःकरणाने निरोप घेतला. हा सोहळा सर्वांसाठी स्मरणात राहणारा ठरला.



## प्रकाश बैद यांचे दु:खद निधन

**वरोरा । प्रतिनिधी**

वरोरा तालुका पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष तथा श्रीराम नागरी सहकारी पत संस्थेचे जेष्ठ अभिकर्ता आणि प्रतिष्ठित नागरिक प्रकाश सी. बैद यांचे वयाच्या ७३ व्या वर्षी हदयकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुली, दोन मुले, पत्नी व नातवंड आणि बराच मोठा आप्तपरिवार आहे. वरोरा तालुका पत्रकार संघ व श्रीराम नागरी संस्थेतर्फे त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. आज त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे.



# भिसी गावात घंटागाडी बंद;कचऱ्यामुळे दुर्गंधीचा त्रास

## नगरपंचायतीच्या उदासीनतेमुळे नागरिक त्रस्त

**चिमूर । प्रतिनिधी**

भिसी ग्रामपंचायतीच्या हद्दीत दररोज सकाळी प्रभागातून घराघरांतून कचरा उचलण्यासाठी फिरणाऱ्या घंटागाड्या मागील पंधरा दिवसांपासून बंद झाल्या आहेत. त्यामुळे गावातील गल्ल्यांमध्ये कचऱ्याचा साठा वाढू लागला असून दुर्गंधी व घाणीमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. पावसाळा सुरू होण्याच्या पार्श्वभूमीवर ही समस्या अधिक गंभीर बनण्याची शक्यता आहे.

दररोज सकाळच्या सुमारास प्रभागातील नागरिक आपल्या घरातील कचरा स्वच्छ करून घंटागाडीत टाकत असत. मात्र गेल्या काही दिवसांपासून घंटागाडी न आल्यामुळे कचरा घरात साचत आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये नाराजी निर्माण झाली असून नगरपंचायतीच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.प्राप्त माहितीनुसार, कचरा गाडी चालकांचे पगार मागील काही महिन्यांपासून थकित आहेत. तसेच कचरा उचलणाऱ्या ठेकेदाराचा वार्षिक ठेका संपला असून नवीन टेंडर अद्याप मंजूर झालेला नाही. यामुळे गेल्या अनेक दिवसांपासून कचरा



व्यवस्थापनाचे काम पूर्णपणे ठप्प झाले आहे.

नगरपंचायतीकडून अतिक्रमण हटविण्याच्या मोहिमेवर भर दिला जात असला तरी कचरा व्यवस्थापनासारख्या मूलभूत सुविधा पूर्णतः दुर्लक्षित झाल्याचे चित्र आहे. गावात ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग तयार झाले असून त्यामुळे मच्छर व इतर रोगराई पसरण्याचा धोका वाढला आहे. नागरिकांच्या आरोग्यावर त्याचा प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या संदर्भात नगरपंचायतीतील एका कर्मचाऱ्याने नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले की, साफसफाईसाठीचा जुना ठेका संपला असून नवीन टेंडरची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. येत्या गुरुवारी नवीन ठेकेदार निवडला जाईल व घंटागाडीचे काम पुन्हा सुरू होण्याची शक्यता आहे.दरम्यान, नागरिकांनीही याबाबत तीव्र संताप व्यक्त केला असून, नगरपंचायतीने तातडीने लक्ष देत घंटागाडीची सेवा पूर्ववत सुरू करावी, अशी जोरदार मागणी होत आहे.

## कांद्याच्या बियाण्यासाठी शेतकऱ्यांची जीवतोड मेहनत

# पावसाच्या लपंडावात थ्रेशिंगला वेग कांदा बियाण्याचे उत्पादन संकटात

> “ शेतकरी माधवराव शंकर जाधव यांनी सांगितले की, पावसामुळे दिवसातून दोन-तीन वेळा गोंडे झाकावे लागतात. मजूरही पटकन मिळत नाहीत. त्यामुळे मजुरी वाढली असून खर्च वाढतो आहे.कांदा बियाणे उत्पादनात यंदा मधमाश्या कमी आल्याने पोलन प्रक्रियेवरही परिणाम झाला असून बियाण्याचे वजन आणि उत्पादन घटले आहे.



**पिशोर ।जावेद शेख**

गेल्या काही दिवसांपासून पिशोर परिसरातील शेतकरी पावसाच्या लहरी स्वभावामुळे चिंतेत सापडले आहेत. अवकाळी पाऊस, वादळ आणि वाऱ्याचा तडाखा यामुळे शेतातील कांद्याचे बियाणे, गोंडे, फुले तसेच बाजरी, मिरची व भाजीपाला पीक संकटात आले आहे.

कांद्याचे बियाणे तयार करताना अत्यंत बारकाईने प्रक्रिया करावी लागते. गोंडे योग्य वेळी सुकवणे, वाळवणे व त्यानंतर बियाणे वेचणे या टप्प्यांमध्ये जराही विलंब झाला तर सर्व मेहनत वाया जाते. यंदा सतत ढगाळ वातावरण आणि अचानक कोसळणारा पाऊस यामुळे शेतकऱ्यांना वेळेआधीच गोंडे सुकवून, थ्रेशर आणि ऊपनेरच्या सहाय्याने बियाणे वेचण्यास भाग पाडले आहे.

### दर चांगला, पण हवा नकारात्मक

यावर्षी कांदा बियाण्यास चांगला दर असूनही सततचे ढगाळ हवामान आणि पावसाचा लपंडाव यामुळे शेतकऱ्यांच्या आशा धुसर होत आहेत. उत्पादन खर्च वाढलेला असून बियाण्याचे प्रमाण आणि गुणवत्ता यावरही परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

### शेतकऱ्यांची धावपळ सुरूच

सध्या शेतकरी प्रचंड मेहनत करत आहेत. गोंडे वेळेत काढणे, झाकपाक करणे, वेळेवर वाळवणे आणि बियाणे वेचणे यासाठी त्यांची धावपळ सुरू आहे. पण यामध्ये पावसाची कोणतीही अनपेक्षित तडाखा बसल्यास नुकसान मोठ्या प्रमाणावर होऊ शकते.

# डॉ.निरंजना गेडाम यांना मानस शास्त्र विषयात आचार्य पदवी

## संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या ४१ व्या दीक्षांत समारंभात सन्मान



**तळोधी (बा.) । प्रतिनिधी**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या ४१ व्या दीक्षांत समारंभात डॉ. निरंजना शामराव गेडाम (धोंगडे) यांना मानसशास्त्र विषयातील आचार्य (झह.ऊ) पदवी प्रदान करण्यात आली. त्यांनी कॉग्निटिव्ह स्टाईल, रेजिलियन्स अँड परसीव्हड पॅरेंटल स्टाईल इन अडोलेसन्स या विषयावर संशोधन करत आपला प्रबंध यशस्वीरित्या पूर्ण केला.

डॉ. गेडाम यांनी शासकीय विदर्भ विज्ञान व मानव्य विज्ञान संस्था, अमरावती येथील मानसशास्त्र विभागाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. संतोष सावदेकर यांच्या मार्गदर्शनाखाली हे संशोधन कार्य केले. त्यांच्या मार्गक्रमणात डॉ. यू.बी. काकडे, डॉ. शफीक पठाण, डॉ. पुरी, डॉ. बर्वे, प्रा. अश्विन जयस्वाल, तसेच आर्ट कॉलेज अनसिंगचे डॉ. अ.पि. जैन यांचेही मोलाचे मार्गदर्शन लाभले.

डॉ. निरंजना गेडाम या सिंदेवाही येथील सेवानिवृत्त विस्तार अधिकारी एस.बी. गेडाम यांची कन्या असून, लाखापूर (ता. सिंदेवाही) येथील मूळ रहिवासी आहेत. सध्या त्या नागपूर येथे वास्तव्यास आहेत. आचार्य पदवीच्या या यशाबद्दल सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे.



नागभिड तालुक्यातील देवपायली येथे सिंधीच्या झाडाला सिंधी लागल्या आहे. आरोग्यासाठी फायदेशिर असल्यामुळें हा रानमेवा सर्वांचें लक्ष वेधुन घेत आहे.(छाया: प्रणय बांगरे)

# उमेद अभियानांतर्गत शिखर महिला प्रभाग संघाची वार्षिक सर्वसाधारण सभा



**वैजापूर । अर्जुन शिंदे**

वैजापूर येथे उमेद अभियानाच्या अंतर्गत शिखर महिला प्रभाग संघाची वार्षिक सर्वसाधारण सभा पार पडली. या सभेला तालुक्याचे माननीय आमदार रमेश पाटील बोरणारे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी महिलांना प्रोत्साहन देत विक्री केंद्रासाठी इमारत उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले.सभेत जिल्हा कक्षातील खोतकर , बिभीषण भोईटे , प्रज्ञा दाभाडे , विलास झाल्टे , तसेच पाणी फाउंडेशनचे विभागीय समन्वयक प्रल्हाद अडसूळ व प्रदीप मुंड यांनी महिलांना विविध मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमात बँकांचे व्यवस्थापक, सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक, पोलीस पाटील, तालुका समन्वयक गणेश सूर्यवंशी, तसेच प्रभाग संघ व ग्राम संघाचे अध्यक्ष, सचिव, कोषाध्यक्ष, सर्व समूहांचे अध्यक्ष, सचिव, सदस्य, उठझ/ङउठझ लिपिका आणि तालुका कक्षातील अधिकार कर्मचारी उपस्थित होते.

# करमाळा देवीचा माळ रोड दुभाजक व सुशोभीकरणासाठी ५० लाख रुपये मंजूर

**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा देवीचा माळ रोडमध्ये सव्वा मीटर अंतराचा रस्ता दुभाजक करण्यासाठी व त्यावर स्ट्रीट लाईट लावून वृक्षारोपण करण्यासाठी तसेच रस्त्याच्या दोन्ही बाजूने संरक्षक जाळी लावण्याचे काम करणे, अबाल व वृद्ध लोकांसाठी पदपाथ करणे आणि लहान मुलांसाठी खेळण्याची व्यवस्था करण्यासाठी ५० लाख रुपये निधी मंजूर झाला आहे.

शिवसेना जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांनी ही माहिती दिली. त्यांनी सांगितले की, यासाठी इस्टिमेट करून लवकरच काम सुरू होईल.उपमुख्यमंत्री कार्यालयाचे प्रमुख मंगेश चिवटे यांनी या रस्त्यावर सातत्याने होणाऱ्या अपघातांचा मुद्दा सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या निदर्शनास आणून दिला होता. नामदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी तत्काळ ५० लाख रुपये मंजूर केले.




श्री कमला भवानी येथे लाखो भक्तांची वर्दळ असलेल्या या रस्त्याचा सुशोभीकरण आणि अपघातमुक्तीसाठी करमाळा शहरवासीयांनी नगरपालिकेकडे वारंवार मागणी केली होती.सोलापूर विभागाचे वरिष्ठ अभियंता श्री माळी, अकलूज विभागाच्या कार्यकारी अभियंता सुनीता पाटील, करमाळा बांधकाम विभागाचे उपअभियंता रमेश पवार आणि मुळवणे रावसाहेब यांच्या प्रयत्नांमुळे हा निधी मंजूर होऊ शकला आहे.

शिवसेना शहरप्रमुख संजय आप्पा शीलवंत यांनी सांगितले की, गेल्या वर्षभरात या रस्त्यावर अनेक अपघात झाले असून, काही लोकांना कायमचे अपंगत्व आले आहे तर एका अपघातात एका व्यक्तीचा बळीही गेला आहे. नवरात्र, आषाढी वारीत लाखो भक्त या रस्त्याने ये-जाता असल्यामुळे या रस्त्याचा अपघातमुक्त होणे अत्यंत आवश्यक आहे.या रस्त्याचा प्रचंड उतार असल्यामुळे मोठ्या अपघाताची भीती होती, पण आता निधी मिळाल्यामुळे रस्ता दुभाजक आणि सुशोभित करून अपघात मुक्त केला जाईल अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

# बीड शहराच्या वैभवात भर घालणाऱ्या सहकार संकुल बांधकामास ना.अजित पवार यांच्याकडुन हिरवा कंदिल

## आ.विजयसिंह पंडित यांच्या प्रयत्नाला यश



**बीड | प्रतिनिधी**

बीड शहरातील जालना रोड परिसरात मुख्य रस्त्यालगत सहकार विभागाचा भुखंड मागील अनेक वर्षापासुन बांधकामाच्या प्रतिक्षेत आहे. या भुखंडावर सहकार विभागातील सर्व कार्यालयांसाठी एकत्रित प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करुन बीड शहराच्या वैभवात भर घालील अशी आकर्षक व देखणी वास्तु उभारावी अशी मागणी आ. विजयसिंह पंडित यांनी उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अजितदादा पवार यांच्याकडे केली होती. ना. अजितदादा पवार यांनी सहकार संकुलाच्या बांधकामास हिरवा कंदिल दाखविला असुन प्रशासनाला या बाबतचे आदेश दिले आहेत. इमारत बांधकामाचा आराखडा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुख्य वास्तु शास्त्रज्ञाकडुन तयार करण्याचे निर्देश प्रशासनाला मिळाले आहेत. पालकमंत्री म्हणुन बीड जिल्ह्यासाठी सहकार संकुलाची प्रशासकीय इमारत ना. अजितदादा पवार यांच्या माध्यमातुन आणि आ. विजयसिंह पंडित यांच्या प्रयत्नातुन मिळणार आहे.

बीड शहरातील जालना रोड परिसरात मुख्य रस्त्यालगत सर्व्हे नंबर १७९९ मध्ये सहकार आयुक्त यांच्या नावाने १५१५.९४ चौरस मिटर आकारमानाचा भुखंड आहे. या शासकीय भुखंडावर सहकार विभागातील प्रशासकीय कार्यालयांसाठी सहकार संकुलाच्या इमारतीचे बांधकाम प्रस्तावित होते. शहरातील काही व्यापाऱ्यांनी खाजगी प्रयोजनासाठी या जागेची मागणी शासनाकडे केली होती. आ. विजयसिंह पंडित यांनी या जागेवर सहकार विभागातील प्रशासकीय कार्यालयांसाठी सहकार संकुलाचे बांधकाम व्हावे यासाठी पाठपुरावा व प्रयत्न केले. ना. अजितदादा पवार यांच्या पालकमंत्री पदाच्या कार्यकाळात बीड शहराच्या वैभवात भर पाडेल अशी आकर्षक वास्तु निर्माण करण्यासाठी आ. विजयसिंह पंडित यांनी ना. अजितदादा पवार यांना साकडे घातले. आ. विजयसिंह पंडित यांच्या मागणीला त्यांनी हिरवा कंदिल दाखवत सहकार संकुलाच्या बांधकामास मान्यता दिली आहे.जिल्हा उपनिबंधक, सहाय्यक निबंधक, देखरेख संघ यासह सहकार विभागातील लेखा परिक्षण विभागाची कार्यालये आणि सहकार विभागाशी संबंधित प्रशिक्षण व मार्गदर्शन केंद्र सहकार संकुलात समाविष्ट करुन ही सर्व कार्यालये एका छताखाली आणुन सहकार विभागाची मुख्य प्रशासकीय इमारत बांधण्याचा मार्ग या माध्यमातुन मोकळा झाला आहे. पालकमंत्री म्हणुन ना. अजितदादा पवार यांच्या कार्यकाळात बीड शहराच्या वैभवात भर घालणारी शासकीय वास्तु जिल्हायाच्या ठिकाणी उभारत असल्याचे समाधान आ. विजयसिंह पंडित यांनी व्यक्त केले आहे.

# खासदार स्मिता वाघ यांना संसदरत्न पुरस्काराने गौरव

**बुसावळ | भूषण शेंदाणे**



खासदार स्मिता उदय वाघ यांना संसदेच्या कामकाजात दिलेल्या उल्लेखनीय योगदानाबद्दल संसदरत्न पुरस्कार २०२५ प्रदान करण्यात आला. देशातील कार्यक्षम खासदारांच्या सन्मानार्थ दिला जाणारा हा पुरस्कार त्यांच्या अल्पकालीन पण प्रभावी कामगिरीची पावती आहे.

लोकसभा व राज्यसभेतील सदस्यांच्या कार्यक्षमतेचा सखोल अभ्यास करून दिला जाणारा हा पुरस्कार प्राइम पॉइंट फाउंडेशन या संस्थेच्या वतीने दिला जातो. या पुरस्काराची संकल्पना माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रेरणेतून २०१० साली सुरु झाली होती.

स्मिता वाघ यांनी संसदेत विविध चर्चांमध्ये सक्रिय सहभाग, महत्त्वपूर्ण प्रश्नांची मांडणी, खासगी विधेयकांचे सादरीकरण, संसदीय समित्यांतील सक्रिय सहभाग, तसेच उच्च उपस्थिती जपत संसदेच्या कार्यात प्रभावी योगदान दिले. त्यांच्या या सर्व पैलूंचा विचार करून त्यांची निवड करण्यात आली.

या पुरस्कारासाठी निवड प्रक्रिया राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर यांच्या अध्यक्षतेखालील स्वतंत्र ज्युरी समिती पार पाडते. लोकसभा आणि राज्यसभा सचिवालय तसेच PRS Legislative Research कडून मिळालेल्या आकडेवारीवर आधारित मूल्यांकनानंतर हा पुरस्कार दिला जातो.

स्मिता वाघ यांचा हा सन्मान त्यांच्या पारदर्शक, प्रभावी व विधायक कार्यपद्धतीची पावती असून, त्या इतर खासदारांसाठी प्रेरणास्थान ठरत आहेत.

## हिंगणघाटच्या वैद्यकीय महाविद्यालयाच्या

# अत्याधुनिक इमारतीच्या निर्मिती व स्क्रीनिंग सोहळ्यास उत्स्फूर्त प्रतिसाद

**हिंगणघाट | प्रतीक हिवंज**



शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, हिंगणघाटच्या नवीन अत्याधुनिक इमारतीच्या प्रत्यक्ष निर्मिती व विशेष स्क्रीनिंग सोहळा १९ मे २०२५ रोजी कटारिया भवन, हिंगणघाट येथे दुपारी १ वाजता उत्साहात पार पडला. हा ऐतिहासिक सोहळा हिंगणघाट शहरासाठी एक अभिमानास्पद क्षण ठरला. कार्यक्रमास हिंगणघाटचे आमदार मा. समीरभाऊ कुणावार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि दृढ नेतृत्वामुळे हे महत्त्वाकांक्षी वैद्यकीय प्रकल्प साकार होत असल्याचे मान्यवरांनी गौरवोद्गारांतून नमूद केले. या प्रसंगी मा. सुधीरबाबू कोठारी (संचालक, कृषी उत्पन्न बाजार समिती), माजी नगराध्यक्ष रवींद्र डागा व प्रेम बसंतानी, सतीश अंभोरे , आर्किटेक्ट अश्फाक, हिम्मतराव चातुर (संचालक, बाजार समिती, समुद्रपूर), तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी रोशन पंडित यांची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमात आर्किटेक्ट अश्फाक यांनी प्रस्तावित इमारतीचा संपूर्ण आराखडा सादर केला, ज्यामध्ये पर्यावरणपूरक रचना, आधुनिक आरोग्य सुविधा व जागतिक दर्जाच्या वैद्यकीय शिक्षण केंद्राचे स्वप्न साकार करण्याचा दृष्टीकोन स्पष्ट करण्यात आला. या नव्या इमारतीमुळे हिंगणघाट व परिसरातील आरोग्य व शैक्षणिक क्षेत्रात नवा आयाम निर्माण होणार असून, भविष्यातील पिढ्यांसाठी हे महाविद्यालय एक प्रेरणास्थान ठरणार आहे.

# संस्कृत भाषेत आपलेपणा आणि गोडवा जाणवतो–आमदार समीर कुणावार

## संस्कृत भारती विदर्भ प्रांत प्रबोधन वर्गाचे भारत विद्यालय, हिंगणघाट येथे उद्घाटन उत्साहात संपन्न

**हिंगणघाट | प्रतिनिधी**




संस्कृत भाषेत आपलेपणा गोडवा जाणवतो. ही भाषा नवीन पिढीत रुजवण्यासाठी सरकारने मान्यता द्यावी व अधिकाधिक प्रयत्न व्हावेत, असे मत आमदार समीरभाऊ कुणावार यांनी व्यक्त केले. ते १९ मे २०२५ रोजी भारत विद्यालय, हिंगणघाट येथील अटल टिंकरिंग लॅबमध्ये आयोजित संस्कृत भारती विदर्भ प्रांत प्रबोधन वर्गाच्या सात दिवसीय शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रमेशराव धारकर (सचिव, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी) होते. प्रमुख उपस्थितीत संजीव कुमार (पश्चिम मध्य क्षेत्र संघटन मंत्री), डॉ. मोहन खेडकर (प्रांत उपाध्यक्ष, संस्कृत भारती), दिलीप सेनाड (वर्गाधिकारी) आणि शैलजा पांडे (प्रांत प्रशिक्षण प्रमुख) यांचा समावेश होता. दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. शैलजा पांडे यांनी संस्कृत ध्येयमंत्राने आणि रंजना पाटील यांनी सुमधुर गीताने वातावरण संस्कृतमय केले. प्रास्ताविक करताना पांडे यांनी या निवासी वर्गामागील हेतू स्पष्ट केला की, संस्कृत ही सर्व भारतीय भाषांची जननी असून ती जनभाषा बनावी यासाठी हा शिबिर उपक्रम महत्त्वपूर्ण आहे. अध्यक्षीय भाषणात रमेशराव धारकर यांनी त्यांच्या संस्थेतील शाळांमध्ये पाचवीपासून दहावीपर्यंत संस्कृत अनिवार्य केल्याचे सांगितले. त्यांनी संस्कृत ही कठीण नव्हे, तर सुरस, सोपी आणि अमृतवत भाषा आहे, असे प्रतिपादन केले. तज्ज्ञांनुसार संगणकासाठीही संस्कृत ही सर्वाधिक उपयुक्त भाषा आहे. या प्रशिक्षण वर्गात विदर्भातील चंद्रपूर, अकोला, अमरावती, वर्धा, यवतमाळ व नागपूर जिल्ह्यांतील एकूण ५० प्रशिक्षणार्थींनी सहभाग घेतला. कार्यक्रमाचे संचालन केतकी डांगे (नागपूर) यांनी केले तर आभार प्रदर्शन शिल्पा साठे (अकोला) यांनी केले. कल्याणमंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली.

# केज मध्ये माहेश्वरी समाजाचा स्तुत्य उपक्रम



**केज (प्रतिनिधि):** श्री बांगड माहेश्वरी मेडिकल वेल्फेअर सोसायटीच्या सहकार्याने महाराष्ट्र प्रदेश माहेश्वरी सभा बीड यांच्या वतीने केज तालुका माहेश्वरी समाज यांच्याकडून ९ते १४ वयातील बालक व१५ ते२६ वयोगटातील तरुण–तरुणीचे कॅन्सर लसीकरण दिनांक ११ मे रोजी केज येथील अजय क्लीनीक मध्ये पूर्ण झाले.

या कार्यक्रमाची सुरुवात महेश भगवान यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. या लसीकरण कार्यक्रमाचे उद्घाटन बीड जिल्हा सेवा संघटक मंत्री गिरीशजी सोनी यांच्या हस्ते झाले यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून श्री बाहेती तसेच बीड जिल्हा उपाध्यक्ष अमोल शेठ भुतडा केज तालुका माहेश्वरी सभा अध्यक्ष मनीष जाजू, सचिव सचिन भुतडा, माहेश्वरी समाजाचे जेष्ठ मुरलीधर भराडिया, रामेश्वर जाजू, संतोष काकाणी, संतोष बियाणी, कैलास जाजू तसेच महिला मंडळ अध्यक्ष मंगल भन्साळी, दिपिका जाकिटिया, अनिता भुतडा, कांताबाई जाजू, इंदानी, दुर्गाताई जाजू, मीनाक्षी जाजू, डॉ. चांडक, यांची उपस्थिती होती यावेळी डॉ. चांडक यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी गिरीष सोनी म्हणाले की, भारतात कॅन्सरचा प्रभाव दिवसांनो दिवस वाढत असून कोणताही आजारावर उपचार ऐवजी प्रतिबंध महत्त्वाचा असतो. कॅन्सर ची लस भारतात उपलब्ध झाली असून बांगड वेल्फेअर सोसायटी यांनी माफक दरात लस उपलब्ध करून दिल्यामुळे २१ जणांना लसीकरण करण्यात येऊ शकले. भविष्यात लसीकरणाचे प्रोजेक्ट चालू राहतील असे तालुका अध्यक्ष मनीष जाजू यांनी सांगितले महेश सेवा संघ बीडचे प्रोजेक्ट चेअरमन किशोर बाहेती यांनी जनजागृती करून मोलाची भूमिका बजावली. कार्यक्रमाची सांगता शहीद जवान व पहेलगाम महिला यात्रेकरूंना श्रद्धांजली वाहून राष्ट्रगीताने करण्यात आली आली. या कार्यक्रमासाठी संतोष बियाणी, कैलास जाजू, अमर बाहेती, संतोष काकाणी यांनी विशेष परिश्रम घेतले. आभार प्रदर्शन सचित भूतडा यांनी केले.

# गेवराईच्या पूर्णवादी नागरिक सहकारी बँकेचा ग्राहक मेळावा उत्साहात संपन्न

**बीड (प्रतिनिधी):** पूर्णवादी नागरिक सहकारी बँकेच्या गेवराई येथील शाखेच्या ३० व्या वर्धापनदिनाच्या निमित्त ग्राहक मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यात ग्राहकांनी बँकेच्या एकंदरीत कारभाराबद्दल समाधान व्यक्त करत खेळीमेळीच्या वातावरणात हा मेळावा संपन्न झाला. या कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन व प्रतिमा पूजनाने करण्यात आली. यावेळी बिचार मंचावर बँकेचे अध्यक्ष डॉ. सुभाष जोशी, संचालक विश्वंभर थिगळे, बँकेच्या बोर्ड ऑफ मॅनेजमेंटचे अध्यक्ष सी.ए. सुरेश लड्ढा, सी. ए. राहुल जाजू, पत्रकार संघाचे अध्यक्ष मधुकर तौर, व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष प्रतापराव खरात, डॉक्टर्स असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. अशोक काळे, डॉ. हेमंतजी वैद्य आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजेश कुलकर्णी यांनी केले. त्यांनी बँकेच्या प्रगतीपथाकडील वाटचालीची ग्राहकांना माहिती देताना बँकेचा लेखाजोखा उपस्थितांसमोर मांडला. तर अध्यक्षीय भाषणात बँकेचे अध्यक्ष डॉ. सुभाष जोशी म्हणाले की, ग्राहकांनी बँकेत खाते उघडून व्यवहार करावा. प्रत्येकाने आपल्याला मिळणाऱ्या उत्पन्नातून बचतीची रक्कम बजा करून उरलेली रक्कम खर्च करावी. बँकेचे अध्यक्ष डॉ. निरंतर यांचे बँकेच्या रोपट्याचे वटवृक्षात रूपांतर होण्यात खूप मोठे योगदान आहे. आपल्या बँकेस धर्माचे अधिष्ठान आहे. आपण कोणत्याही पद्धतीने यश मिळविण्यापेक्षा बँकेच्या नियमास अधीन राहून यश संपादन करीत आहोत आणि याच कारणामुळे बँक प्रगतीपथावर आहे. बँकेचे ग्राहक, सभासद तसेच कर्मचारी यांच्यावर विश्वास व्यक्त करून २४०० कोटींचे टार्गेट पूर्ण करण्याचा संकल्प आहे आणि आपल्या सर्वांच्या सहकार्याने तो यशस्वीरीत्या पूर्ण होणार असल्याचा विश्वासही त्यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला. बाप्रसंगी लह चव्हाण, सुनीता लह चव्हाण, शेख रईसभाई सायकल मार्टवाले, अरुण चाळक यांचा विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बँकचे शाखाधिकारी व सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अशोक गलांडे यांनी, तर डॉ. हेमंतजी वैद्य यांनी आभार प्रदर्शन करून समारोपीय भाषण केले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



### ८४८ शिबिरार्थ्यांच्या थरारक प्रात्यक्षिकांनी

# आनंद निकेतन महाविद्यालयातील २० दिवसीय योग व क्रीडा शिबिराचा उत्साही समारोप







**वरोरा । आशिष घुमे**

महारोगी सेवा समिती संचालित आनंद निकेतन महाविद्यालयाच्या सहाव्या ग्रीष्मकालीन योग व क्रीडा प्रशिक्षण शिबिराचा समारोप दि. १४ मे रोजी उत्साही वातावरणात झाला. २० दिवस चाललेल्या या शिबिरात ५ ते ७५ वयोगटातील ८४८ शिबिरार्थ्यांनी सहभाग घेत २८ पारंपरिक व आधुनिक क्रीडा प्रकारांचे प्रशिक्षण घेतले. समारोप प्रसंगी झालेल्या चित्तथरारक प्रात्यक्षिकांनी उपस्थित १५०० हून अधिक पालक आणि क्रीडाप्रेमींना मंत्रमुग्ध केले.या शिबिराचे उद्घाटन २५ एप्रिल रोजी सौ. पल्लवी आमटे यांच्या हस्ते झाले होते. प्रमुख पाहुणे म्हणून सुधाकर कडू, अनिकेत आमटे, डॉ. अरविंद सवाणे, प्रा. राधा सवाणे, योगगुरू दीपक शिव, प्रा. तानाजी बायस्कर उपस्थित होते. शिबिरात मल्लखांब, रोप मल्लखांब, टांगता मल्लखांब, एरियल सिल्क, योगासन, कराटे, तायक्कांडो, वुडबॉल, भारतीय व्यायामप्रकार, कबड्डी, खो-खो, फुटबॉल, बास्केटबॉल, आर्चरी, नेटबॉल, स्केटिंग आदी खेळांचे प्रशिक्षण देण्यात आले.

समारोप समारंभासाठी अध्यक्ष म्हणून डॉ. विकास आमटे, प्रमुख अतिथी म्हणून प्रा. श्रीकांत पाटील, डॉ. विजय पोळ, माधव कवीश्वर, डॉ. संजय साबळे, दीपक शिव आणि प्रा. राधा सवाणे यांची उपस्थिती लाभली. शिबिराच्या मशाल ज्योत शमवून आणि ध्वजावतरण करून समारंभास प्रारंभ झाला. लहान शिबिरार्थ्यांच्या घुंगरू काठी कवायतीने प्रात्यक्षिकांना सुरुवात झाली. त्यानंतर विविध प्रकारचे थरारक आणि कौशल्यपूर्ण प्रात्यक्षिके सादर करण्यात आली.प्रशिक्षकांच्या जोडी कवायतीने शिबिराला उत्कर्ष बिंदू गाठून दिला. ११० शिबिरार्थी निवासी होते, ज्यांच्यासाठी दररोज उपाहार व कार्यशाळांची व्यवस्था करण्यात आली होती. यंदा देशभरातील ७ राज्ये आणि महाराष्ट्रातील १९ जिल्ह्यांमधून शिबिरार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

प्रा. श्रीकांत पाटील यांनी आपल्या भाषणात शिबिरामध्ये शिस्त, संस्कार आणि नेतृत्वगुण रुजवले जात असल्याचे सांगून संस्थेचे कौतुक केले. अध्यक्षीय भाषणात डॉ. विकास आमटे यांनी जम्मू-काश्मीरमध्ये मल्लखांबाचे प्रात्यक्षिक सादर करून राष्ट्रीय भावना जागवण्याचा संकल्प आयोजकांपुढे ठेवला.

शिबिरात युग मांदाळे, विहान चौधरी, वल्लभ गेडाम, श्रद्धा पिंगे, योगेश्वरी सूर्यवंशी, प्रियांशी कोवे यांची ‘उत्कृष्ट शिबिरार्थी’ म्हणून निवड झाली. कु. गौरी झाडे आणि मयूर भोयर यांना ‘उत्कृष्ट प्रशिक्षक’ म्हणून गौरवण्यात आले. शिबिर यशस्वीपणे पार पाडण्यासाठी प्राचार्य डॉ. मृणाल काळे, प्रा. राधा सवाणे, प्रा. तानाजी बायस्कर यांच्या मार्गदर्शनाखाली मुकेश खंगार, किरण बारेकर व ७२ प्रशिक्षकांचे योगदान उल्लेखनीय ठरले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. तानाजी बायस्कर व महेश सोनवणे यांनी केले. आभार प्रदर्शन प्रा. बायस्कर यांनी केले. राष्ट्रगीताने समारोप सोहळ्याची सांगता झाली.

# पुणे बोर्डात इंग्रजी विषयात प्रथम येण्याचा मान करमाळ्याच्या नमिराकडे

### डॉ.बापूजी साळुंखे व श्रीमती सिताबाई काळे पारितोषिकाने सन्मानित

**सोलापूर । प्रतिनिधी**

महात्मा गांधी ज्युनियर कॉलेज ऑफ सायन्स, करमाळा येथील विद्यार्थिनी कु. फकीर नमिरा इन्नुस हिने पुणे विभागीय बोर्डात ‘इंग्रजी’ विषयात प्रथम क्रमांक पटकावत करमाळा तालुक्याच्या शैक्षणिक इतिहासात नवा मानदंड निर्माण केला आहे.






२०२३-२४ मध्ये झालेल्या बारावी परीक्षेत नमिराने ‘इंग्रजी’ विषयात थक्क करणारे १०० पैकी ९५ गुण मिळवत पुणे बोर्डात अव्वल स्थान मिळवले. याबद्दल तिची ‘डॉ. बापूजी साळुंखे पारितोषिक’ आणि ‘श्रीमती सिताबाई काळे पारितोषिक’ देऊन बोर्डातर्फे विशेष सन्मान करण्यात आला आहे.बोर्डाने कॉलेजला पत्राद्वारे सदर पुरस्कारांची माहिती कळवून, पारितोषिक रक्कमेचा धनादेश पाठवून नमिराचे अभिनंदन केले आहे. ही गौरवाची बाब असून, इंग्रजी विषयात पुणे बोर्डात प्रथम क्रमांक मिळवणारी नमिरा ही करमाळा तालुक्यातील आणि कॉलेजच्या इतिहासातील पहिली विद्यार्थिनी ठरली आहे.या यशामागे इंग्रजी विषयाचे प्रा. दत्तात्रय भागडे यांचे मार्गदर्शन लाभले. तिच्या या प्राविण्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष जयवंतराव जगताप, नगराध्यक्ष व विश्वस्त वैभवराजे जगताप, विश्वस्त शंभूराजे जगताप, प्राचार्य बी. के. पाटील, उपप्राचार्य अनिस बागवान, पर्यवेक्षक रमेश भोसले, पर्यवेक्षिका सुनिता नवले, विज्ञान शाखा प्रमुख प्रा. विजय पवार तसेच सर्व सहशिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व पालकांनी तिचे विशेष अभिनंदन केले आहे.करमाळा तालुक्याला गौरव मिळवून देणाऱ्या नमिराचे यश आगामी विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल, अशी सर्वत्र प्रतिक्रिया उमटत आहे.

# सामाजिक बांधिलकी जोपासत मनसर येथे दहावी पास मुलांचे सत्कार

**मनसर । प्रतिनिधी**

राज्य आणि देशाच्या राजकीय व सामाजिक क्षेत्रात निष्कलंक, निष्ठावान, प्रखर नेतृत्व करणाऱ्या नारी शक्ती महिला मंडळाच्या अध्यक्षा ज्योती यादव यांच्या व लोक कल्याण ग्राहक संरक्षण संस्थेच्या वतीने मनसर येथे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले. यामध्ये दहावीच्या विद्यार्थ्यांचे चांगले गुण मिळाल्याबद्दल सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमाला नारी शक्ती महिला मंडळाच्या महिला आघाडीतील निकिता प्रजापती, दीपाली वाघमारे, पौर्णिमा भोयर, मनिषा मनगटे, लक्ष्मी वाडीवे यांचा उपस्थिती लाभली.



अध्यक्ष ज्योती यादव यांनी सांगितले की, नारी शक्ती महिला मंडळ महिलांवर होणाऱ्या अत्याचारांवर, छेडखानीसारख्या घटनांवर त्वरित न्याय मिळवून देण्याच्या कामात अग्रेसर आहे. तसेच लोक कल्याण ग्राहक संरक्षण संस्थेतही ग्राहकांच्या तक्रारींवर त्वरीत कारवाई करून न्याय मिळवून दिला जातो. कार्यक्रमात ज्योती ताई यांनी महिला व समाजाच्या विविध समस्या, पोलिस, डॉक्टरांकडून न्याय न मिळाल्यास कोणत्याही वेळी रात्री- दिवसा महिलांना न्याय मिळावा यासाठी ते पूर्णपणे तत्पर आहेत, असे सांगितले. या कामगिरीमुळे नारी शक्ती महिला मंडळाच्या अध्यक्ष ज्योती यादव यांच्याकडे अनेक महिला त्यांच्या समस्या घेऊन येतात.नारी शक्तीने सामाजिक बांधिलकीची जबाबदारी भरीव पद्धतीने पार पाडत महिलांना सक्षम बनवले असून त्यांच्या न्यायासाठी काम करत आहे, असे या कार्यक्रमातून स्पष्ट झाले.

# जयंतीनिमित्त आयोजित स्पर्धेतील विजेत्या संघांना पारितोषिकांचे वितरण

### धम्मचक्र बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेतर्फे घेण्यात आल्या स्पर्धा

**अंबाजोगाई (प्रतिनिधी):** येथील धम्मचक्र बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेतर्फे डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या जयंतीनिमित्त आयोजित मिरवणूक व विविध स्पर्धेतील विजेत्या संघांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले.धम्मचक्र बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेतर्फे डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या जयंतीनिमित्त आयोजित विविध स्पर्धेचे परीक्षण करण्यात आले. मिरवणूक स्पर्धेचे परीक्षक म्हणून दत्ता देवकते, मनेष गोरे, बाळासाहेब म्हस्के, पिराजी कुसळे यांच्या सोबतच संस्थेचे सदस्य गंगाराम ओहाळ, मनात भोसले यांनी अंबाजोगाईतील सर्व जयंती मंडळांना स्वतः भेट देऊन परीक्षण केले होते. त्यामध्ये अंबाजोगाई शहरातील सिद्धार्थनगर जयंती उत्सव समिती (प्रथम क्रमांक) तर डॉ.बाबासाहेब आंबेडकरनगर नवीन मोरेवाडी (द्वितीय क्रमांक), संत कबीरनगर (तृतीय क्रमांक) हे संघ विजेते ठरले. सामुहिक महिला गट टिपरी - रमाई चौक (प्रथम क्रमांक), वैयक्तिक नृत्य लहान गट - वेदा कृष्णा वाघमारे (प्रथम क्रमांक), तसेच अंबाजोगाई शहरातील देखाव्यांमध्ये भीमनगर, परळी वेस (प्रथम क्रमांक), डॉ.बाबासाहेब आंबेडकरनगर नवीन मोरेवाडी (द्वितीय क्रमांक) यांना पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. यावेळी संत कबीरनगर भागातील काही विद्यार्थी विविध सरकारी सेवेमध्ये रूजू झाले. त्यापैकी १) सुजाता प्रकाश कसबे (इन्कम टॅक्स ऑफिसर), २) लक्ष्मण धोत्रे (महाराष्ट्र पोलिस), ३) रत्नदीप संजय कांबळे (विद्युत सहाय्यक) या गुणवंतांचा संस्थेच्या मार्फत यशवंतराव चव्हाण महाविद्यालयासमोरील महावितरण कार्यालयाजवळ आयोजित एका विशेष कार्यक्रमात यथोचित सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून माजी आमदार पृथ्विराज साठे, माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी, बीड जिल्हा परिषदेचे माजी शिक्षण व आरोग्य सभापती राजेसाहेब देशमुख, ज्येष्ठ नेते कॉ.बब्रुवाहन पोटभरे, आरपीआय नेते महेंद्र निकाळजे, सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले, माजी जि.प.सदस्य पंडीत अण्णा जोगदंड, प्रवीण देशमुख, भिमराव सरवदे, संघटनेचे प्रवीण जगताप, गणेश भोसले, माजी नगरसेवक संतोष शिनगारे, माजी नगरसेवक दिनेश भराडीया, सचिन जाधव या मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.





या उपक्रमासाठी अंबाजोगाई येथील कर्तव्यदक्ष उपजिल्हाधिकारी दीपक वजाळे यांनी विधायक उद्देशाने धम्मचक्र बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेला सहकार्य म्हणून पाच हजार रूपयांची पुस्तके भेट म्हणून दिली. त्याबद्दल संस्थेच्या वतीने सन्माननीय उपजिल्हाधिकारी महोदयांचे आभार मानण्यात आले. तर 'महाराष्ट्रात गाजले एक नांव, अंबाजोगाई पुस्तकांचे गांव' या संकल्पनेतून सर्व प्रमुख पाहुण्यांना संस्थेतर्फे पुस्तकं भेट म्हणून देण्यात आली. यावेळी गायक सुभाष शेप, गायिका मयुरी यांनी प्रबोधनपर भीम व बुद्ध गीते सादर केली. सदरील कार्यक्रमाच्या संयोजनामध्ये धम्मचक्र बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष राहुल मस्के, सचिव सुगत सरवदे, सदस्य सचिन वाघमारे, अमोल सरवदे, रवींद्र जोगदंड, राजकुमार मस्के, गंगाराम ओहाळ, किरण गायकवाड, तौसिफ सिद्दिकी, धीरज सरवदे यांनी सहकार्य केले. हा उपक्रम कबीरनगरच्या तरूण पिढीसाठी दिशादर्शक ठरणारा आहे. डॉ.आंबेडकर जयंतीत त्यांनी डिजे लावला नाही, तर लोकप्रबोधनाचा कार्यक्रम मिरवणुकीत दाखविला, विविध स्पर्धा घेतल्या व कर्णकर्कश आवाज मुक्त जयंती काढली त्यांना बक्षीसे ही दिली. सदरील कार्यक्रमास या भागातील महिला, ज्येष्ठ नागरिक, युवक आणि तमाम जनतेने मोठा प्रतिसाद दिला. विचार आंदोलन आणि चळवळ या केंद्राला अनुसरून भीमजयंती निघावी व जयंती खुद्द एक वैचारिक आंदोलन बनावे यासाठी ज्येष्ठ नेते कॉ.बब्रुवाहन पोटभरे यांच्यासह उपस्थित सर्व सन्माननीय मान्यवरांनी या उपक्रमासाठी पुढाकार घेणाऱ्या धम्मचक्र बहुउद्देशिय संस्था व त्यांच्या सर्व पदाधिकारी, सदस्य आणि कबीरनगरच्या प्रवर्तनवादी विचार जोपासणाऱ्या तरूणांचे विशेष अभिनंदन केले. अतिशय भारावलेल्या वातावरणात या कार्यक्रमाचा समारोप झाला.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .